वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी
विद्यापीठ ग्रंथालय
ईमेल: vnmkvlibrarian@gmail.com
कार्यालय फोन क्रमांक:०२४५२-२३२४७१

जा.क्र. विग्रं/जडसंग्रह/६४८/२०२३ दिनांक:१३/१०/२०२३

# निविदा सुचना

विद्यापीठ ग्रंथालय,वनामकृवि,परभणी येथील कालबाहय/निरोपयोगी साहित्य व इतर भंगार विक्री/लिलाव साठी वैध परवानाधारक/दुकानदार यांच्या कडुन मोहोर बंद लिफाफ्यात निविदा मागविण्यात येत आहेत. विहित नमुण्यातील निविदा विद्यापीठ ग्रंथालयात कार्यालयीन वेळेत **(सुटटीचे दिवस वगळून)** दिनांक.१६.१०.२०२३ पासुन उपलब्ध आहेत निविदा दाखल करण्याचा शेवटचा दिनांक २३.१०.२०२३ रोजी (सांय ०६.०० पर्यन्त) आहे.

विहित नमुण्यातील निविदा विद्यापीठ ग्रंथालयातून खरेदी करणे आवश्यक आहे दिनांक २३.१०.२०२३ नतंर आलेल्या निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत.

**अटी व शर्ती :**

१ निविदा विहित नमुन्यात नसल्यास ती स्विकारली जाणार नाही. निविदेसोबत स्क्रॅप खरेदी (भंगार खरेदी) बाबतचा अद्यावत/नुतनीकरण केलेला वैध परवाना आवश्यक आहे.विहित नमुन्यातील निविदा विद्यापीठ ग्रंथालयात विक्री साठी उपलब्ध आहे.

२ कोणतेही कारण न देता संपुर्ण लिलावाची प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार लिलाव समितीने राखुन ठेवला आहे.

३ निविदा भरतेवेळी अनामत रक्कम रू.१०,०००/- (अक्षरी रू.दहा हजार फक्त) ही डीमांड ड्राफ्ट या माध्यमाव्दारे देता येईल. डीमांड ड्रॉफ्ट राष्ट्रीयकृत बँकेचा असावा. डीमांड ड्रॉफ्ट हा **नियत्रंक,व.ना.मकृवि,परभणी** यांच्या नावे व वनामकृवि,परभणी शाखेत देय असावे.

४ सर्वात जास्त रक्कमेचे निविदा (एच-१) मंजुर झाल्यानतंर सदरील व्यक्ती/कंत्राटदार/संस्था यांनी नतंर लिलावातील सामान न घेता लिलाव प्रक्रिंयेतुन माघार घेतल्यास भरलेली अननामत परत केली जाणार नाही व सदरील साहित्य घेण्याचा अधिकार एच-२/एच-३...या क्रमाने असेल परंतु सदरील साहित्याची किंमत त्यांना एच-१ ने निविदेत दिलेल्या किंमती प्रमाणेच द्यावी लागेल. एच-१ ने दिलेल्या किंमती पेक्षा कमी किंमतीत सदरील साहित्य दिले जाणार नाही.

५ लिलावाची निविदा मंजुर झाल्यानंतर सदरील साहित्य नेणा-या व्यक्ती/कंत्राटदार/संस्था यांना लिलाव साहित्याची सर्व रक्कम भरून सदरील साहित्य खरेदी आदेश मिळाल्या पासुन सात दिवसाच्या आत घेवून जाणे बंधनकारक असेल सात दिवसाच्या आत साहित्य न नेल्यास प्रति दिन रू. ५००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

६ आलेल्या निविदेमध्ये विद्यापीठाने ठरवून दिलेल्या रक्कमे पेक्षा मुळ किंमत कमी असल्यास लिलाव समिती लिलाव प्रक्रिया रद्द करेल.

७ लिलावातील साहित्य स्वखर्चाने व स्वतःच्या मजुराव्दारे घेवुन जावे लागेल.

८ लिलावाचे साहित्य ग्रंथालयाच्या बाहेर नेताना ते व्यवस्थितरित्या बाहेर घेउन जावे लागेल. भंगाराचे साहित्य ग्रंथालया बाहेर नेतांना ग्रंथालयातील वस्तु/इमारतीस/रंगास इजा झाल्यास त्याची नुकसान भरपाई स्वतंत्रपणे द्यावी लागेल.

९ लिलाव प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर एक महिण्याच्या आत अनामत रक्कम (डी.डी) परत दिली जाईल.

१० लिलाव साहित्याच्या खरेदी किंमतीवर स्वतंत्रपणे सर्वंकष १८ टक्के जीएसटी स्वतंत्र आकारण्यात येईल.

११ लिलावातील साहित्य आहे त्या स्थितीत स्वीकारावे लागेल त्या बद्दल कुठलीही तक्रार चालणार नाही.

१२ निविदा स्विकारणे/उघडणे बाबतच्या तारखांमध्ये बदलाबाबत विद्यापीठ ग्रंथालयाचा निर्णय अंतिम राहील.

१३ लिलाव प्रक्रियेबाबत काही वाद निर्माण झाल्यास तो परभणी न्यायालया अंतर्गत राहूनच सोडविण्यात येईल.

१४ निविदा मंजुर झाल्यानंतर भंगार साहित्य घेण्यास नकार देणा-या संस्था/दुकानाची अनामत रक्कम जप्त केली जाईल व त्याचे नाव काळया यादीत समाविष्ट केले जाईल.

१५ संपुर्ण भंगार साहित्याचा एकच लॉट असेल भंगार साहीत्य विकत घेणा-यास सर्वच साहित्य विकत घ्यावे लागेल.

१६ निविदा उघडण्याच्या बैठकीस केवळ दुकानादार/संस्थेच्या फक्त एका व्यक्तीसच उपस्थित राहता येईल.

अध्यक्ष,
लिलाव समिती
विद्यापीठ ग्रंथालय,व.ना.मकृवि,परभणी